३) योजनेत काम केलेल्या विद्यार्थ्यांना, विद्यापीठाच्या अनुदानातून देण्यात आलेल्या रक्कमेच्या धनाकर्ष अथवा धनादेशाच्या छायांकीत प्रती

४) धनादेश वटवलेल्या विद्यार्थ्यांच्या बॅक पासबुकची छायांकीत प्रती

५) सनदी लेखापालांकडून परिक्षण केलेला रक्कमेचा जमाखर्चाचा हिशोब.

६) सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये, सनदी लेखापालांचे उपयोगिता प्रमाणपत्र ( Utilisation Certificate )

७) योजनेतंर्गत दिलेल्या, अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी वर नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन, सदर पत्राच्या दिनांकापासुन, (उन्हाळी सुट्टी, हिवाळी सुट्टी वगळून किंवा विद्यार्थ्यास अपरिहार्य कारणामुळे, अपघात झाला किंवा आजारी असल्यास विद्यार्थी काम न करु शकल्यास पुढे तेवढेच सुट्टी घेतलेले दिवस मोजुन तेवढेच दिवस काम देण्यात यावे) आठ महिने पुर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत विद्यापीठास पाठविणे अनिवार्य आहे.

८) महाविद्यालयाने रु. ५००/- ची ऑडीट फी पावती पाठवावी.

योजनेअंतर्गत काम करण्यास इच्छूक नसणाऱ्या विद्यार्थ्यांची रक्कम त्वरित विद्यापीठास परत करावी अन्यथा सदर रक्कमेवर बॅकेच्या प्रचलीत व्याज दराप्रमाणे व्याज आकारण्यात येईल. कमवा व शिका योजना राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिल्यास सदर अनुदानाची रक्कम " कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक." यांच्या नावे नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाव्दारे विद्यापीठास परत करावी.

शिल्लक राहिलेली रक्कम विद्यापीठास परत करण्यासाठी, लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमेचे देयक मंजूर होणार नाही. सदर खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे.

सदर योजनेसाठीच्या लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी पुढील सुचना देण्यात याव्यात.

अ) योजनेचे लाभार्थी विद्यार्थी आपल्या शैक्षणिक अध्ययनात खंड पडू देणार नाही.

ब) योजनेतील कामाचा महाविद्यालयात नोकरी/सेवेशी कोणताही संबंध रहाणार नाही.

क) लाभार्थी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील शिस्त व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

ड) योजनेतील लाभार्थी विद्यार्थी दरवर्षी नव्याने निश्चित केले जातील, त्यासाठी विद्यार्थ्यांने दरवर्षी नव्याने अर्ज करणे आवश्यक असेल.

इ) महाविद्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या कामाबाबत/सेवेबाबत तसेच आर्थिक व्यवहार संपूर्ण जबाबदारी महाविद्यालय व विद्यार्थी यांची असेल व त्याबाबत विद्यापीठाकडे तक्र करता येणार नाही.

ई) लाभार्थी विद्यार्थ्याला महिन्यातील जास्तीत जास्त २० दिवस अशाप्रकारे वर्षातील जास्ती जास्त ०८ महिने काम दयावे. त्यामुळे विद्यार्थ्याला (रु.५० प्रती तास प्रमाणे) कमा रु. १६,०००/- प्रती वर्ष एवढीच रक्कम विद्यापीठातर्फे अदा करता येईल याची नों घ्यावी. (रु ५०×२ तास ×२० दिवस =रु. २,०००/- दरमहा ×०८ महिने = १६,०००/-) कमवा व शिका योजनेचा लाभ अंत्यत गरीब व गरजु विद्यार्थ्यांना मिळाव यासाठी मा. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी योजनेचे नियमित संनियंत्रण (Regular Monitoring) करणे आवश्यक आहे व विद्यापीठाच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही. याची कृपया नोंद घ्यावयाची आहे.

तसेच आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच उलट टपाली देण्यात यावी व योजनेबाबतच्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करावे. सदर पत्राची प्रत संबंधीत विद्यार्थ्यांस देण्यात यावी. ही विनंती.

धन्यवाद !

प्र.संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग

(टिप : सदर योजनेचा आठ महिन्याच्या कालावधी संपल्यानंतर दि. ३१/१०/२०२० पर्यंत योजनेचे समायोजन करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.)

सोबत : १) सनदी लेखापालांचे उपयोगिता प्रमाणपत्राची नमुना प्रत.
२) हजेरीपत्रकाची नमुना प्रत.
३) जमा व खर्चाचा हिशोब.

माहितीस्तव प्रत : महाविद्यालयाने सदर पत्राच्या छायांकीत प्रती लाभार्थी विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## Maharashtra University of Health Sciences, Nashik
MUHS

वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.
EPABX : 0253-2539100-300, Phone : 0253-2539173
E-mail : sw@muhs.ac.in Web.:www.muhs.ac.in

डॉ. संदिप धों. गुंडरे
एम.बी.बी.एस., एम.डी.
संचालक, विद्यार्थी कल्याण

Dr. Sandeep D. Gundre
M.B.B.S., M.D.
Director, Students' Welfare


मआविवि/एसडब्लु/स्कीम/2238/२०१९ दिनांक: 22 /11/२०१९

प्रति,
मा.अधिष्ठाता/प्राचार्य

____________________
____________________
____________________

विषय : बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेचे अनुदान आर.टी.जी.एस. केल्याबाबत....
संदर्भ : मआविवि/एसडब्लू/स्किम/१२१८/२०१९ दि.२१/०६/२०१९

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी विद्यापीठाने लागू केलेल्या बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेसाठीचे प्रस्ताव विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांकडून मागविण्यात आले आहेत. योजनेच्या अटी व शर्ती तसेच विद्यापीठाच्या प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णया नुसार प्रस्तावाची छाननी केल्यानंतर सदर योजनेचे अनुदान मिळणेकरीता आपल्या महाविद्यालयाचा प्रस्ताव पात्र ठरला आहे.

त्याअनुषंगाने योजने अंतर्गत विद्यापीठाचे अनुदान रु. १०,०००/- व ऑडीट फी रु. ५००/- असे एकूण रक्कम रु. १०,५००/- इतक्या रक्कमेचे आर.टी.जी.एस. दि. ११ /११ /२०१९ रोजी महाविद्यालयाच्या बचत खात्यात जमाकरण्यात आले आहे. योजनेतंर्गत आपल्या महाविद्यालयात सिनीयर विद्यार्थी व नविन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी रॅगिंग विषयी व्याख्यानमाला व समुपदेशन, रॅगिंग विषयी शिक्षक व महाविद्यालय आवारातील इतर घटक उदा. वार्डन, कॅन्टीन स्टाफ, सुरक्षा रक्षक यांचेसाठी व्याख्यान माला, महिला सबलीकरण, स्त्री भ्रुणहत्या, व्यसनमुक्ती, संवाद कौशल्य विकास, व्यक्तीमत्व विकास, आपत्ती व्यवस्थापन, तणाव व्यवस्थापन अवयवदान जनजागृती, कुपोषण समस्या, रोकड रहित (Cashless) या विषयावर परिसंवाद/चर्चासत्रे/शिवीर आयोजीत करावयाची आहेत. सदर व्याख्यानमालेसाठी व परिसंवाद/चर्चासत्रे/शिवीर यासाठी वक्त्यांचे वैयक्तीक माहितीपत्र (बायोडाटा) या विभागाच्या माहितीसाठी पाठविण्यात यावा. सामाजिक जवाबदारीमध्ये विद्यापीठाचाही थोडाफार हातभार असावा या हेतूने सदर योजने करीता देण्यात येणारे अनुदान हे निव्वळ खर्च होण्यासाठी किंवा खर्चाची प्रतिपुर्ती म्हणून न पाहता समाज नवनिर्मीतीच्या कामात

Noted & forwarded to Ms. Nilesh for further action
10/12/19



Dr.V.V.P.F's Institute of Nursing Education, Ahmednagar
Inward No 352
Date 10.12.19

सहभाग घेऊन सामाजिक ऋणांची परतफेड करण्यासाठी मिळालेली संधी या दृष्टीने पहावे. त्यासाठी विद्यापीठाने महाविद्यालयास सदर योजनेअंतर्गत दिलेल्या अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी पत्रात नमुद केलेल्या सुचनांच्या आधारे तसेच खालील नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन दि. २८/०२/२०२० पर्यंत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे.

दि. २८/०२/२०२० पर्यंत अनुदान रक्कम खर्च करणे बंधनकारक आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेची अंमल बजावणी करतांना पुढील सुचनांची नोंद घ्यावी.**

१) महाविद्यालयाने योजनेच्या माध्यमातून अनिवासी स्वरुपाची एक दिवसाची व्याख्यानमाला व एक दिवसाचे शिबीर/परीसंवाद/चर्चासत्र आयोजित करणे बंधनकारक आहे.

२) महाविद्यालयास यापेक्षा जास्त कार्यक्रम राबवावयाचे असल्यास त्यास मुभा राहील मात्र अतिरिक्त कार्यक्रमासाठी आलेला खर्च महाविद्यालयाला करावयाचा आहे.

३) योजनेतंर्गत विद्यापीठाने व्याख्यानमालेसाठी व परिसंवाद/शिवीर/चर्चासत्र यासाठी वक्त्यांच्या प्रवास भाडयाची अनुक्रमे स्थानिक प्रवास भाडे रु. २५०/- बाहेरगावहुन आलेल्या मान्यवरांसाठी जास्तीत जास्त रु.१,०००/- विद्यापीठ नियमानुसार अनुज्ञेय राहील. तरी जवळच्या मार्गाने होणारे प्रत्यक्ष जे प्रवास भाडे असेल त्यात फक्त एस.टी./रेल्वे द्वितीय श्रेणीचे प्रत्यक्ष प्रवास भाडे देण्यात यावे. कारने प्रवास केला असला तरी उपरोक्त प्रमाणेच कमाल देय रक्कम ग्राहय धरण्यात यावी. संस्थेने प्रवास भाडयाची अदायगी करतांना दक्षता घ्यावी. (विद्यापीठाच्या खर्चाच्या नियमानुसार करणे बंधनकारक आहे.)

४) वक्त्यांना/व्याख्यात्यांना अदा करण्यात आलेल्या मानधनाची व प्रवास भाडयाची कार्यक्रमनिहाय प्रत्येक वक्त्यांचे स्वतंत्र व्हाऊचर्स असणे बंधनकारक आहे.

५) योजनेमधील व्याख्यानमाला तसेच चर्चासत्र/शिबीर/परीसंवाद यासाठीचे विषय या पत्रात नमूद केलेले आहे. पत्रामध्ये दिलेल्या विषयांच्या व्यतिरिक्त शिबीराचे आयोजन करावयाचे असल्यास विद्यापीठाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

६) व्याख्यात्यांना / वक्त्यांना मानधन व प्रवास भत्ता व्यतीरिक्त किंवा निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त रक्कम खर्च केल्यास अतिरिक्त अदायगीस मान्यता मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

७) योजनेच्या कार्यक्रमस्थळी / व्यासपीठावर / मंडपात "सदर व्याख्यानमाला महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक बहि:शाल शिक्षण मंडळाच्या विद्यमाने आयोजित" असे दर्शविणारा बॅनर लावणे आवश्यक आहे.

८) कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन, अतिथीचे स्वागत किंवा शिबीरार्थीचे चहापान व भोजन व्यवस्थेमध्ये भपकेबाजपणा असु नये. साध्या व सोप्या पध्दतीने परंतू स्वच्छ व निटनेटकी व्यवस्था असावी.

९) विद्यापीठाने सोबत जोडलेल्या महाविद्यालयाने करावयाच्या खर्चाच्या तपशिला प्रमाणेच खर्च करण्यात यावा व त्याच प्रमाणे बीले समायोजनास पाठविण्यात यावी. अन्यथा अनुदानाची

रक्कम परत विद्यापीठास पाठविण्यात यावी.

बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेचे समायोजन करण्यासाठी पुढील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

१) कार्यक्रमाचा अहवाल, फोटोग्राप्स्/वृत्तपत्राची कात्रणे इ.

२). कार्यक्रमनिहाय व्याख्यात्यांना/वक्त्यांना अदा करण्यात आलेल्या मानधनाची मुळ व्हाऊचर्स (Original Vouchers) प्रत्येक वक्त्यांचे स्वतंत्र जोडावे.

३) कार्यक्रमनिहाय व्याख्यात्यांना / वक्त्यांना अदा करण्यात आलेल्या प्रवासखर्चाची मुळ तिकीटे प्रत्येक वक्त्यांचे व्हाऊचर्ससह सादर करावे.

४) कार्यक्रमासाठी प्रत्यक्ष झालेल्या इतर प्रशासकीय खर्चाची मुळ बिले (Original Bills) कार्यक्रमनिहाय व्हाऊचर्ससह खर्चनिहाय स्वतंत्रपणे सादर करावे. (प्रत्येक खर्चाच्या देयकानिहाय स्वतंत्र व्हाऊचर्स सादर करावे)

५) पत्रासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) सनदी लेखापालांकडून (Chartered Accountant) लेखा परिक्षण करुन सोबत जोडावे.

६) पत्रासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील जमाखर्च / हिशोब सनदी लेखापालांकडून प्रमाणित करुन सोबत जोडावे.

७) रु. ५००/- ची मुळ ऑडीट फी ची पावती सोबत जोडावी.

८) बहि:शाल शिक्षण मंडळ योजना राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिल्यास सदर अनुदानाची रक्कम "कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक" यांच्या नावे नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाद्वारे विद्यापीठास त्वरीत परत करावी अन्यथा सदर रक्कमेवर बॅकेच्या प्रचलीत व्याज दराप्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

९) शिल्लक राहिलेली रक्कम विद्यापीठास परत करण्यासाठी लागणारा खर्च मंजूर होणार नाही. सदर खर्च महाविद्यालयाने सोसावा.

१०) योजनेबाबतचा अहवाल व हिशोब पाठवितांना दोन्ही कार्यक्रम झाल्यानंतर लगेच महाविद्यालयाचा कामाचा अहवाल, वृत्तपत्रातील कात्रणे/फोटोग्राफस् व योजनेचे हिशोब पत्रक सनदी लेखापालाकडून (Chartered Accountant) लेखापरिक्षण करुन उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) व हिशोबपत्रकासह सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात पाठवावे. महाविद्यालयाने योजनेअंतर्गत दिलेल्या अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी पत्रात नमुद केलेल्या सुचनांच्या आधारे सर्व कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन दि. ३१/०३/२०२० पर्यत अधिष्ठाता/प्राचार्य यांनी प्रमाणित करुन विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे.

कृपया आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच उलट टपाली पाठवावी व योजनेबाबतच्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.

धन्यवाद !

संचालक
विद्यार्थी कल्याण

सोबत : वरीलप्रमाणे

F:\Pen Drive\office\Sw - Scheme\SW- Scheme 2011-12-13\covering letter schemes\Bahishal Forwarding DD to College

बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेच्या माध्यमातुन व्याख्यानमाला, परीसंवाद, चर्चासत्र किंवा शिबीरं यांच्या आयोजनासाठी विद्यापीठामार्फत प्रदान करण्यात आलेल्या अनुदान रक्कमेचा महाविद्यालयाने खर्च करावयाचा तपशिल

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| अ) | व्याख्यानमालेसाठी ( १ दिवस) | |
| | क. वक्त्याचे मानधन (रु.१,००० X २) | रु. २,०००/- |
| | ख. वक्त्यांचा प्रवास खर्च (विद्यापीठाच्या नियमानुसार स्थानिक प्रवासभाडे रु.२५०/- प्रतिवक्ता (२५० X २) बाहेरगावहुन आलेल्या वक्त्यांसाठी जास्तीत जास्त रु.१,०००/-X २) | रु.५००/- किंवा २,०००/- |
| | ग. प्रशासकीय व अनुषंगीक खर्च | रु.५००/- |
| | प्रति व्याख्यान एकुण | रु.३,०००/- किंवा ४,५००/- |
| ब) | परीसंवाद / शिबीर / चर्चासत्र ( २५ व्यक्तींसाठी १ दिवस) | |
| | क. वक्त्याचे मानधन (रु.१००० X २ वक्ते) | रु. २,०००/- |
| | ख. वक्त्यांचा प्रवासखर्च (विद्यापीठाच्या नियमानुसार स्थानिक प्रवासभाडे रु.२५०/- प्रतिवक्ता (२५० X २) बाहेरगावहुन आलेल्या वक्त्यांसाठी जास्तीत जास्त रु. १००० X २ वक्ते) | रु.५००/- किंवा २,०००/- |
| | ग. सहभार्गींचा चहापान व भोजन खर्च | रु. १,०००/- |
| | घ. इतर प्रशासकीय व अनुषंगीक खर्च | रु.५००/- |
| क) | ऑडीट फी रु. ५००/- | रु.५००/- |
| | एकुण | रु.४,५००/- किंवा ६,०००/- |
| | एकुण (अ + ब + क) | रु.७,५००/- किंवा रु.१०,५००/- |

## Utilization Certificate for the Scheme of

(Name of the Scheme)

**( To be given by the Chartered Accountant )**

Certified that the grant of Rs. ( In Figure )........................................... ( In Words ) Rs. ............................................................................................. has been received by the Dean / Principal of (College name ) ........................................................................... .................................................................................. from Maharashtra University of Health Sciences, Nashik through DD. No. .............. Dtd...../...../ .......... for the Scheme ( Name of the scheme ) ..............................................................................................

With reference to the Vouchers and books of accounts, submitted to me, it is hereby certified that Dean / Principal of this College / Institute has utilized the grant of Rs.................

(In Figure) (in words) Rs................................................................................ for the said purpose.

The DD No. ................. Dtd. ....../......./.......... of unspent grant of Rs. ................ ( In Figure ) ( in words) Rs..............................................................) is returned herewith.

Place :

Date :

Signature, Name, Stamp & Seal of
Chartered Accountant

Signature, Name, Stamp & Seal of
Dean / Principal

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
Maharashtra University of Health Sciences, Nashik
वणी – दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४.
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.
MUHS
EPABX : 0253-2539100-300, Phone : 0253-2539179/169/170
E-mail : sw@muhs.ac.in Web.:www.muhs.ac.in

डॉ. संदीप धों. गुंडरे
एम.बी.बी.एस., एम.डी
संचालक, विद्यार्थी कल्याण

Dr. Sandeep D. Gundr
M.B.B.S., M.
Director, Students' Welfar

मआविवि/एसडब्लु/स्कीम/२८e /२०१९ दिनांक: ०६/०२/२०१९ १८

प्रति,

मा. अधिष्ठाता/प्राचार्य
पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील
फाऊंडेशन यांचे परिचर्या महाविद्यालय
एम.आय.डी.सी. अहमदनगर – ४१४१११

विषय : कमवा व शिका योजनेचे अनुदान आर.टी.जी.एस. केल्याबाबत....
संदर्भ : मआविवि/एसडब्ल्यु/स्कीम/९६८/२०१८ दि.०३/०७/२०१८

मा.महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विद्यापीठाने लागू केलेली कमवा व शिका योजनेसाठीचे प्रस्ताव विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून मागविण्यात आले आहेत. सदर प्रस्तावांची छाननी केल्यानंतर योजनेच्या अटी, शर्ती व निकषांनुसार योजनेचे अनुदान, प्रति विद्यार्थी रु.१६,०००/- इतकी रक्कम मिळणेसाठी खालील नमुद केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पात्र आहेत. यापूर्वी संदर्भीय परिपत्रकानुसार पाठविण्यात आलेल्या व नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून, महाविद्यालयाने सुट्टीचे दिवस वगळता प्रत्येक दिवशी फक्त दोनच तास निवडक स्वरुपाची कामे विद्यार्थ्यांना देण्यात यावी, व त्या मोबदल्यात विद्यापीठातर्फे रु. ५०/- प्रती तास या दराने मेहनताना अदा करण्यात यावा. त्यासाठी खालील नमुद केल्याप्रमाणे ०४ विद्यार्थ्यांकरीता व ऑडीट फी रु. ५००/- असे विद्यापीठाचे एकत्रित अनुदान म्हणून रु.६४,५००/- इतकी महाविद्यालयाच्या बचत खात्यात दि.१८/०२/२०१९ रोजी आर.टी.जी.एस. करण्यात आली आहे.

लाभार्थी विद्यार्थी :
१):- वेताळ गुणश्री हंसराज
२):- गावडे राजश्री उद्धव
३):- रहाणे अर्पिता विलास
४):- आनप कैलास पोपट
५):-

Need ... pls refer & follow. We need to make proper plan & oversight of activity
2/3/19

अ) कमवा व शिका योजनेचे समायोजन करण्यासाठी पुढील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

१) योजनेअंतर्गत महाविद्यालयाने विद्यार्थ्यास सोपविण्यात आलेल्या कामाचा उल्लेख करुन " कमवा व शिका योजनेकरीता .....................(विद्यार्थ्याचे नाव) ............या आर्थिक दृष्टया मागासलेल्या गरीब विद्यार्थ्यास काम देण्यात आले आहे". असे अधिष्ठाता/प्राचार्य यांचे प्रमाणपत्र.

२) योजना समन्वयक, अधिष्ठाता/प्राचार्य यांनी स्वाक्षरी केलेली कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांची दरमहा हजेरीपत्रकाची मुळ प्रत. ( Original Copy)

३) योजनेत काम केलेल्या विद्यार्थ्यांना, विद्यापीठाच्या अनुदानातून देण्यात आलेल्या रक्कमेच्या धनाकर्ष अथवा धनादेशाच्या छायांकीत प्रती

४) धनादेश वटवलेल्या विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकची छायांकीत प्रती

५) सनदी लेखापालांकडून परिक्षण केलेला रक्कमेचा जमाखर्चाचा हिशोब.

६) सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये, सनदी लेखापालांचे उपयोगिता प्रमाणपत्र ( Utilisation Certificate )

७) योजनेतंर्गत दिलेल्या, अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी वर नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन, सदर पत्राच्या दिनांकापासुन, (उन्हाळी सुट्टी, हिवाळी सुट्टी वगळून किंवा विद्यार्थ्यास अपरिहार्य कारणामुळे, अपघात झाला किंवा आजारी असल्यास विद्यार्थी काम न करु शकल्यास पुढे तेवढेच सुट्टी घेतलेले दिवस मोजुन तेवढेच दिवस काम देण्यात यावे) आठ महिने पुर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत विद्यापीठास पाठविणे अनिवार्य आहे.

८) महाविद्यालयाने रु. ५००/- ची ऑडीट फी पावती पाठवावी.

योजनेअंतर्गत काम करण्यास इच्छूक नसणाऱ्या विद्यार्थ्यांची रक्कम त्वरित विद्यापीठास परत करावी अन्यथा सदर रक्कमेवर बँकेच्या प्रचलीत व्याज दराप्रमाणे व्याज आकारण्यात येईल. कमवा व शिका योजना राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिल्यास सदर अनुदानाची रक्कम " कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक." यांच्या नावे नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाद्वारे विद्यापीठास परत करावी.

शिल्लक राहिलेली रक्कम विद्यापीठास परत करण्यासाठी, लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमेचे देयक मंजूर होणार नाही. सदर खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे.

सदर योजनेसाठीच्या लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी पुढील सुचना देण्यात याव्यात.

अ) योजनेचे लाभार्थी विद्यार्थी आपल्या शैक्षणिक अध्ययनात खंड पडू देणार नाही.
ब) योजनेतील कामाचा महाविद्यालयात नोकरी/सेवेशी कोणताही संबंध रहाणार नाही.
क) लाभार्थी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील शिस्त व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.
ड) योजनेतील लाभार्थी विद्यार्थी दरवर्षी नव्याने निश्चित केले जातील, त्यासाठी विद्यार्थ्यांनी दरवर्षी नव्याने अर्ज करणे आवश्यक असेल.

इ) महाविद्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या कामाबाबत/सेवेबाबत तसेच आर्थिक व्यवहारा संपूर्ण जबाबदारी महाविद्यालय व विद्यार्थी यांची असेल व त्याबाबत विद्यापीठाकडे तक्रा करता येणार नाही.

ई) लाभार्थी विद्यार्थ्याला महिन्यातील जास्तीत जास्त २० दिवस अशाप्रकारे वर्षातील जास्ती जास्त ०८ महिने काम दयावे. त्यामुळे विद्यार्थ्याला (रु.५० प्रती तास प्रमाणे) कमात रु. १६,०००/- प्रती वर्ष एवढीच रक्कम विद्यापीठातर्फे अदा करता येईल याची नों घ्यावी.(रु ५०×२ तास ×२० दिवस =रु. २,०००/- दरमहा ×०८ महिने = १६,०००/-) कमवा व शिका योजनेचा लाभ अंत्यत गरीब व गरजु विद्यार्थ्यांना मिळाव यासाठी मा. अधिष्टाता/प्राचार्य यांनी योजनेचे नियमित संनियंत्रण ( Regular Monitoring ) करणे आवश्यक आहे व विद्यापीठाच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही. याची कृपया नोंद घ्यावयाची आहे.

तसेच आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच उलट टपाली देण्यात यावी व योजनेबाबतच्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करावे. सदर पत्राची प्रत संबधीत विद्यार्थ्यांस देण्यात यावी. ही विनंती.

धन्यवाद !

संचालक
विद्यार्थी कल्याण

(टिप : सदर योजनेचा आठ महिन्याच्या कालावधी संपल्यानंतर दि. ३१/०१/२०२० पर्यत योजनेचे समायोजन करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.)

सोबत : १) सनदी लेखापालांचे उपयोगिता प्रमाणपत्राची नमुना प्रत.
२) हजेरीपत्रकाची नमुना प्रत.
३) जमा व खर्च हिशोब नमुना.

माहितीस्तव प्रत : महाविद्यालयाने सदर पत्राच्या छायांकीत प्रती लाभार्थी विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

MUHS

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## Maharashtra University of Health Sciences, Nashik

वणी – दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४.
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.
**EPABX :** 0253-2539100-300, **Fax :** 0253-2539171, **Phone :** 0253-2539173
**E-mail :** sw@muhs.ac.in **Web.:**www.muhs.ac.in

**डॉ. संदिप धों. गुंडरे**
एम.बी.बी.एस., एम.डी.
संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

**Dr. Sandeep D. Gundre**
M.B.B.S., M.D.
Director, Students' Welfare Dept.

मआविवि/एसडब्लु/स्कीम/५.१६/2549/२०१७ — दिनांक: 29 /12 /२०१७

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य
D.V.R.V.V. P.F.
College of Nursing.
Ahmed Nagar.

**विषय : पुस्तक पेढी योजनेची अनुदान रक्कम आर.टी.जी.एस.केल्याबाबत...**
**संदर्भ : मआविवि/एसडब्लू /स्किम/५.२/१४६८/१७ दि.२८/०६/२०१७**

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी विद्यापीठाने लागू केलेल्या पुस्तक पेढी योजनेसाठीचे प्रस्ताव विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांकडून मागविण्यात आले आहेत. आपल्या महाविद्यालयाचा प्रस्ताव उपरोक्त संदर्भीय पत्राव्दारे प्राप्त झालेला आहे. योजनेच्या अटी व शर्ती तसेच विद्यापीठाच्या प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रस्तावांची छाननी केल्यानंतर सदर योजनेचे अनुदान मिळणेकरीता आपल्या महाविद्यालयाचा प्रस्ताव पात्र ठरला आहे.

त्याअनुषंगाने योजने अंतर्गत विद्यापीठाचे अनुदान **रु. ३०,५००/–** इतक्या रक्कमेचे **आर.टी.जी. एस. दि.20/12 /२०१७** रोजी महाविद्यालयाच्या बचत खात्यात जमा करण्यात आले आहे. सदर अनुदानातून महाविद्यालयाने विद्याशाखानिहाय पुस्तके खरेदी करुन, यापूर्वी पाठविण्यात आलेल्या योजना परिपत्रकात नमुद केलेल्या अटी व शर्ती नुसार अर्थिक दृष्टया दुर्बल/गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करावे. तसेच महाविद्यालयाने योजनेअंतर्गत दिलेल्या अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी खालील नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन **दि. ३१/०३/२०१८** पर्यत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे.

-Noted, -Vinus Handle, do the needful,

**पुस्तक पेढी योजनेचे समायोजन करण्यासाठी पुढील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.**

१) नोंदणीकृत पुस्तकालयातून खरेदी केलेल्या, पुस्तक संचाची मुळ देयके (Original Bills) व सुट दिल्याचा तपशिल.

२) पुस्तके खरेदी करण्यासाठी, कमीत कमी तीन नोंदणीकृत पुस्तकालयातून मागविण्यात आलेल्या पुस्तकांच्या यादीप्रमाणे त्यांच्या दरपत्रकांची ( Quotations ) प्रत्येकी एक प्रमाणे तीन मुळ प्रति.

27/1/18

३) अनुदान रक्कमेच्या जमा खर्चाचा हिशोब सनदी लेखापालांकडून (Chartered Accountant) परिक्षण केलेला मुळ अहवाल/प्रमाणपत्र.

Principal Nursing College

G:\Scheme\SW Scheme 2017-18\Book Bank Scheme A.Y2017-18\Book Bank R.T.G.S. College Letter 2017-18\book bank R.T.G.S.College Letter 2017-18.docx

16 JAN 2018

P.D.V.V.P.F.'s Medical College & Hospital, Ahmednagar
Inward No. 093
Date 16/01/2018

५) "सदर पुस्तके विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीने उपयुक्त असून त्यांचे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येईल " असे अधिष्ठाता/प्राचार्य यांचे प्रमाणपत्र.

६) खरेदी केलेल्या पुस्तकांची नोंद ग्रंथालयात घेण्यात येऊन नोंदवहीच्या प्रतीची झेरॉक्स प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

७) रु. ५००/- ची ऑडीट फी ची मुळ पावती प्रस्तावासोबत जोडावी.

८) लाभार्थी विद्यार्थ्यांची नावे, प्रदान करण्यात आलेल्या पुस्तकांची तपशिल व संख्या व पुस्तके प्राप्त झाल्याची विद्यार्थ्यांची स्वाक्षरी इ. मजकुर असलेली अधिष्ठाता/प्राचार्य यांची साक्षांकित यादी प्रस्तावासोबत जोडावी

९) योजने अंतर्गत महाविद्यालयाने पुस्तके खरेदी न केल्यास सदर अनुदान रक्कम रु. ३०,५००/- दि.३१/०३/२०१८ पर्यंत विद्यापीठास परत करावी अन्यथा सदर रक्कमेवर राष्ट्रीयकृत बॅकेच्या प्रचलीत व्याज दराप्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

१०) पुस्तकपेढी योजना राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिल्यास सदर अनुदानाची रक्कम **"कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक"** यांच्या नांव नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाव्दारे विद्यापीठास दि.३१/०३/२०१८ परत करावी.

११) शिल्लक राहिलेली रक्कम विद्यापीठास परत करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमेचे देयक मंजूर होणार नाही. सदर खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे.

**<u>पुस्तक पेढी योजनेची अंमलबजावणी करतांना पुढील सुचनांची नोंद घ्यावी.</u>**

१) अनुदानाच्या रक्कमेतून तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार विद्याशाखानिहाय आवश्यक असलेल्या पुस्तकांचे संच नोंदणीकृत पुस्तकालयातून खरेदी करण्यात यावे व खरेदी करण्यात आलेल्या मुळ बिलामध्ये पुस्तकालयाचे नाव, दुरध्वनी क्र. (एस.टी.डी. कोडसहीत ), पुस्तकाच्या किंमती व त्यावर सुट दिल्याचा तपशिल, पुस्तकालयाच्या मालकाचा सही व शिक्का यांचा स्पष्ट समावेश असणे आवश्यक आहे.

२) पुस्तके खरेदी करण्यासाठी, पुस्तकालयांकडून दरपत्रके (Quotations ) मागविताना पुस्तकालयाचे नाव, दुरध्वनी क्र. (एस.टी.डी. कोडसहीत), पुस्तकाच्या किंमती व त्यावर सुट दिल्याचा तपशिल, पुस्तकालयाच्या मालकाची सही व शिक्का यांचा स्पष्ट समावेश असणे आवश्यक आहे.

३) खरेदी केलेली पुस्तके महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ठेवावी व सदर पुस्तके गरीब, गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना एक वर्षाच्या कालावधीसाठी वाटप करावी. योजनेचा लाभ देण्यासाठी महाविद्यालयाने, उपलब्ध पुस्तक संचाच्या प्रमाणात विद्यार्थीसंख्या निश्चित करुन त्याप्रमाणे पुस्तकांचे वाटप करावे.

४) पुस्तके सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असली तरी पुस्तकांची पाच वर्षापर्यंत जतन करण्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या ग्रंथपालाची असणार आहे. या पाच वर्षामध्ये पुस्तकांची दुरुस्ती/बाईडिंग यावर येणारा खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे. या खर्च रक्कमेचे देयक मंजूर होणार नाही.

५) दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस सदर योजनेची पुस्तके वाटप करण्यासाठी महाविद्यलयांच्या प्राचार्यांनी योजनेची प्रसिध्दी/परिपत्रक प्रदर्शित करावे व इच्छूक विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवावे. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन आर्थिकदृष्टया मागासलेल्या गरीब, गरजू, व होतकरु विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करावे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता ठेवावी म्हणजे तक्रारी येणार नाही. तद्नंतरही तक्रार आल्यास महाविद्यालय स्तरावर तक्रारीचे निराकरण करावे.

६) विद्यापीठ अनुदान प्राप्त पुस्तकांवर खालील मजकूराचा गोल शिक्का बनवून स्टॅमपिंगकरणे आवश्यक आहे. या पूस्तकांच्या वाटपासाठी स्वतंत्र नोंदणी पुस्तक ठेवावे. विद्यापीठाच्या विविध तपासणी समिती व अधिकाऱ्यांना सदर नोंदणी पुस्तक तपासण्याचे अधिकार असेल याची नोंद घ्यावी.




७) पुस्तक पेढी योजनेचा लाभ खरोखरच्या गरजू विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी मा. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी निरंतर संनियंत्रण ( Continuous Monitoring ) करणे आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.

कृपया आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच, उलट टपाली दयावी व योजनेतंर्गत दिलेल्या अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी पत्रात नमुद केलेप्रमाणे कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन **दि.३१/०३/२०१८** पर्यत विद्यापीठास पाठविणे अनिवार्य आहे.

धन्यवाद !

**संचालक**
**विद्यार्थी कल्याण विभाग**

**सोबत :-** वरीलप्रमाणे

# पुस्तक पेढी योजनेचा जमा व खर्चाचा हिशोब

| जमा | खर्च | शिल्लक रक्कम |
|---|---|---|
| १)विद्यापीठ अनुदान<br>रु. ............................<br>धनाकर्ष क्र......................<br>दि. ............................ | रु. | रु. ..............<br>धनाकर्ष क्र. ............व<br>दि. ...................... |
| २) महाविद्यालयाचे रक्कम<br>रु. ...................... | रु. | रु. |
| एकूण | रु. | रु. |

सनदी लेखापालांचा सही व शिक्का

अधिष्ठाता/प्राचार्यांचा सही व शिक्का